# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणे कामाची ई-निविदा मागविणे करीता मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.४० चौ.कि.मि. असून पाणी पुरवठा विभागाचे दैंनदिन कामकाज प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय चालते. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणे कामी निविदेची मुदत ३१ मार्च २०२३ रोजी संपत आहे. भिवंडी शहराला स्टेम प्राधिकरण यांचेकडुन ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका कडून ४० द.ल.लि. तसेच मनपाचे स्वत:चे व-हाळ तलाव २ द.ल.लि. असा एकूण ११५ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे.

महानगरपालिकेचे आस्थापनेवर पाणी पुरवठा विभागाकरीता ५० पदे मंजुर असून त्यामधील ४९ पदे भरलेली आहे. त्यापैकी मयत- ३, सेवा निवृत्त-६, बडतर्फ- १, पाईप लाईन व बोअरवेल दुरुस्ती करीता -४, अंपग- ७ व २ कर्मचारी पदवीधर असून संगणकाचे ज्ञान असल्यामुळे पाणी पुरवठा विभागाचे संगणकीय कामकाज पाहत आहेत. तसेच १ व्हॉल्वमन ठाणे महानगरपालिकेकडे वर्ग करण्यांत आलेला आहे. त्यामुळे सद्या २५ व्हॉल्वमन कार्यरत आहेत.

भिवंडी शहरातील वाढती लोकसंख्या व नव्याने विकसीत होणारे नागरीकांमुळे नवीन रहिवाशी क्षेत्र मोठया प्रमाणात विकसीत होत आहे. त्यामुळे भिवंडी शहराची वाढती लोकसंख्या व नव्याने विकसीत झालेले क्षेत्र विचारात घेता लोकसंख्येमुळे पाणी पुरवठयाचे झोन वाढलेले आहेत. शहरात अंदाजे ४१३ व्हॉल्व आहेत. एकात्मीक पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहरात बांधण्यात आलेल्या १४ जलकुंभामधील ७ जलकुंभ कार्यान्वीत करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे शहरातील झोन निहाय व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता तीन पाळीमध्ये ११० ते १२० व्हॉल्वमनची आवश्यकता आहे. शहरात दैंनदिन पाणी पुरवठा वितरीत करणे करीता मनपाचे आस्थापनेवर व्हॉल्वमन कर्मचारी उपलब्ध नाहीत. त्यामुळे शहरात झोन निहाय वेळापत्रकानुसार व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता अडचण निर्माण होत असल्यामुळे सन्मा. नगरसेवक, पदाधिकारी तसेच नागरीक यांचे भ्रमणध्वनीवरुन व दुरध्वनीवरुन तक्रारी प्राप्त होत असतात. त्यामुळे प्रशासनाला नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे.

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रामध्ये एकुण ५८ व्हॉल्वमन कंत्राटी कामगारांची निविदा मागविण्यांत आलेली होती. परंतु सन २०२३-२०२४ या वर्षामध्ये ताडाळी येथील नवीन जलकुंभ कार्यान्वीत करणेत आलेला असून, नवीवस्ती, नेहरुनगर येथील नव्याने अंथरणेत आलेल्या जलवाहिनी मधून झोन निहाय पाणी पुरवठा करणे कामी ३ नवीन व्हॉल्वमनची आवश्यकता आहे.

सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता एकूण ६१ व्हॉल्वमन (कंत्राटी कामगार) सेवा पुरविणे कामी रु.२,४४,०२,१८६/- मात्र रक्कमेस दि. ०६/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळालेली आहे.

भिवंडी नि.शहर महानगपालिके अंतर्गत ठेकेदारांव्दारे करण्यात येणाऱ्या कामावर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना शासकीय नियमानूसार किमान वेतन लागू करणे आवश्यक आहे. सदर कामगारांना किमान वेतन लागू न केल्यास मूळ मालकास फौजदारी गुन्हा दाखल करणेची तरतूद आहे. सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालयाकडील **क्र.सकाआ/भिवंडी/२०२३/१२१ दिनांक २३/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये** दर निश्चीत करून त्याबाबत मान्यता घेऊन पाणी पुरवठा भागात काम करणा-या कंत्राटी कामगारांना किमान वेतन लागू केले आहे. (**अकुशल कामगार**-किमान वेतन रु.११,५००/- अधिक विशेष भत्ता रु.७०७०/- एकुण रु.१८,५७०/- व इतर भत्ते ई.पी.एफ. १२ टक्के अधिक १ टक्के प्रशासकीय,बोनस ८.३३ टक्के, उपदान ४.१७ टक्के, रजा वेतन ६.५० टक्के ई.एस.आय.सी. ३.२५ टक्के, घरभाडे ५ टक्के असे एकुण **रु.२६,०४४/-** होत आहेत.) (**अर्धकुशल कामगार-** किमान वेतन रु.१३०००/- अधिक विशेष भत्ता रु.७०७०/- एकुण रु.२००७० व इतर अनुज्ञेय भत्ते असे एकुण **रु.२८,१४८/-** होत आहेत.)

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबत प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत सन २०२३-२४.** | २,४४,०२,१८६/- |

**शासन आदेश क्र.एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक यांना आहेत.**

प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात एका वर्षासाठी व्हॉल्वमन सेवा पुरविणेकामी रु.२,४४,०२,१८६/- मात्र रक्कमेस ई निविदा मागविणेकरीता मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमाक** 930 **दिनांक** 28/03/**२०२३**

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबत कामास प्रशासकीय,आर्थीक मान्यता व ई निविदा मागविणेकामी बाबत सन २०२३-२०२४ करीता प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबत ई निविदा मागविणेकामी मंजूरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

प्रस्तावना :- कबुतरांपासुन होणाऱ्या आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उपविधी मध्ये रु. ५००/- दंड आकारणी करण्यासाठी मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.

उपविधी प्रमाणे मनपा कार्यक्षेत्रात दंडात्मक कारवाई करणेसाठी मा. महासभा ठराव क्र. ०३, दि. २४/०७/२०१७ नुसार मा. महासभेने मान्यता दिली आहे. तसेच उपविधी प्रमाणे त्रयस्थ संस्थेमार्फत दंडात्मक कारवाईची अंमलबजावणी करण्यासाठी मा. महासभा ठराव क्र. ३५२, दि. १९/०७/२०२१ रोजी मा. महासभेने मान्यता दिली आहे. या व्यतिरिक्त प्रशासकिय ठराव क्र. ८६, दि. ३०/०१/२०२३ रोजी निविदे द्वारे प्राप्त निविदाकार व निविदाकार यांनी सादर केलेल्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी मान्यता दिली आहे.

कबुतरांच्या पिसांसह विष्ठेतुन बाहेर पडणाऱ्या जंतुंमुळे "हायपर सेंसिटीव्ह न्युमेनिया" चा (HP) आजार बळावण्याचे प्रमाण पुण्यासह मुंबईतही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. फुफ्फुसांशी संबंधित आजार झालेल्यांमध्ये "हायपर सेंसिटीव्ह न्युमेनिया" हा आजार होण्याचे सर्वाधिक प्रमाण ६० ते ६५ टक्के आहे. भिवंडी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कबुतर पक्षी मोठ्या प्रमाणात आढळतात. बृहन्मुंबई महानगरपालिका व ठाणे महानगरपालिका यांनी कबुतरांपासुन होणाऱ्या आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन कबुतरांस उघड्यावर खाद्य पदार्थ टाकणे या प्रकरणी रु.५००/- दंड आकारण्याचे नियोजित केले आहे. त्याच धर्तीवर भिवंडी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कबुतरांस उघड्यावर खाद्य पदार्थ टाकु नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उपविधी मध्ये रु. ५००/- दंड म्हणुन आकारणी करण्याची मान्यता घेणेसाठी मा. महासभा अस्तित्वात नसल्याने मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** १२९ दि. २८/०३/२०२३

भिवंडी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कबुतरांपासुन होणाऱ्या आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन कबुतरांस उघड्यावर खाद्य पदार्थ टाकणे या प्रकरणी रु.५००/- दंड आकारण्याचे प्रस्ताव सादर केले आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग२)/ नवि, दि. ०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ(१अ) व १(ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार ( महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी मनपाच्या कार्यक्षेत्रात कबुतरांस उघड्यावर खाद्य पदार्थ टाकु नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उपविधी मध्ये रु. ५००/- दंड आकारणी करण्यासाठी सादर केले असुन सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

421- MY DOC-2023 (HELATH DEP PRASTAVN – 2023)